# जाहिर सुचना

बृहतसुचीवरील पात्र अर्जदारांना कळविण्यात येते की, बृहतसुचीवरुन सदनिका वितरणाकरिता संगणकीय सोडत आयोजित करण्यात येणार आहे. सदर सोडतीच्या अनुषंगाने पात्र भा /र यांची यादी व सोडतीकरिता उपलब्ध सदनिकांची यादी महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या संकेतस्थळ www.mhada.maharashtra.gov.in वर प्रकाशित करण्यात आली आहे.

पात्र भा /र यांना म्हाड अधिनियम १९७६ मधील तरतुदीनुसार व प्राधिकरणाच्या धोरणेनुसार अनुज्ञेय क्षेत्रफळा इतक्या गाळ्याचे वितरण हे विनामुल्या करण्यात येते. तथापि, अनुज्ञेय क्षेत्रफळापेक्षा अधिकच्या क्षेत्रफळाकरिता प्रचलित / चालु आर्थिक वर्षाचा शिघ्रसिद्धगणक दराच्या ११० % दराप्रमाणे आकारणी करण्यात येते.

सदर सोडतीकरिता ज्या भा /र यांच्या उपकरप्राप्त इमारतीतील सदनिकेचे क्षेत्रफळ ३०० चौ. फुटा पेक्षा कमी आहे. तसेच ज्या भा /र यांना अनुज्ञेय क्षेत्रफळापेक्षा जास्त क्षेत्रफळाच्या गाळ्याकरिता (म्हणजेच ३०० चौ. फुटापेक्षा जास्त) शिघ्रसिद्धगणक दराच्या (रेडी रेकनर) ११०% या दराने शुल्क अदा करणे शक्य नाही अशा पात्र भा /र यांनी दि. २१/०४/२०२५ रोजी सायकाळी ५.०० वाजेपर्यंत ३०० चौ.फुटापेक्षा अधिक क्षेत्रफळाचा गाळा वितरीत करण्यात स्वारस्य नाही अशा आशयाचे पत्र उपमुख्य अधिकारी / पुगा/ दुवपु मंडळ कक्ष क्र. ३७२, दुसरा मजला, गृहनिर्माण भवन, कलानगर, वांद्रा (पुर्व), मुंबई-५१ येथे सादर करावे. तसेच विहित मुदतीत सदर पत्र प्राप्त न झाल्यास अनुज्ञेय क्षेत्रफळापेक्षा अतिरिक्त क्षेत्रफळाचा गाळा वितरीत करण्यास आपली हरकत नाही हे गृहित धरुन पुढील कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**सहमुख्य अधिकारी**
मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ

Scanned with OKEN Scanner